Exh. 5


# मिरज ग्रामीण पोलीस ठाणे,

## सांगली

पंढरपूर रोड मिरज सांगली- ४१६४१५

फोन - ०२३३ -२२३२१३३

ईमेल- id - mirajrural.sangli@mahapolice.gov.in


मिरज ग्रा.पो.ठाणे जावक क्रमांक :- 1832 /२०२६ दिनांक :- 25/०३/२०२६

प्रति,

मा. प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी सो,
मिरज कोर्ट, यांना सविनय सादर.

रिपोर्ट :-एम.पी.कांबळे, पोना १६९७, मिरज ग्रामीण पोलीस ठाणे, सांगली.
संदर्भ- जा.क्र.१९४८/२०२६ फौजदारी न्यायालय, मिरज दि.२४/०३/२०२६ फौजदारी किरकोळ अर्ज क्र.९१/२०२६

**विषय :- अर्जदार यांचे मुद्देमाल परतीसाठी म्हणणे सादर केलेबाबत...**

महोदय,

| | | | |
|---|---|---|---|
| १ | पोलीस ठाणे | - | मिरज ग्रामिण पोलीस ठाणे, जि.सांगली. |
| २ | गुन्हा रजि नं कलम | - | गु.र.नं.१२२/२०२६ प्रा.छळ प्रति.अधि.क.११(१),(डी),(जे),(सी), मोटर वाहन अधिनियम कलम ६६,१९२ प्रमाणे |
| ३ | तपासी अधिकारी | - | एम.पी.कांबळे, पोना १६९७, मिरज ग्रामीण पो. ठाणे |
| ४ | फिर्यादीचे नाव - | - | सनी काशिनाथ तोडकर, वय ३४ वर्षे, पोशि २३६५, नेमणुक मिरज ग्रामिण पोलीस ठाणे |
| ५ | आरोपीतांचे नाव व पता | - | पांडुरंग हणमंत पाटील, वय ५१ वर्षे रा.कुप्पगिरी, ता.खानापुर जि.बेळगाव |
| ६ | गुन्हा घडल ता वेळ ठिकाण | - | दिनांक १४/०३/२०२६ रोजी २०.३० वा. ते २१.१५ वा.चे सुमारास सुभाषनगर हुळ्ळे प्लॉट, गल्ली नं.११ ता.मिरज येथे |
| ७ | गुन्हा दाखल ता वेळ | - | दिनांक १५/०३/२०२६ रोजी ०६.२२ वा. |
| ८ | अटक तजवीज | - | आरोपी यास दिनांक १६/०३/२०२६ रोजी बीएनएसएस ३५(३) प्रमाणे नोटीस अदा करण्यात आली आहे. |
| ९ | गुन्हयाचा हेतु | - | बेकायदेशिर जनावरांची वाहतुक |
| १० | जप्त मुद्देमाल | - | १) १,५०,०००/-रु. पांढऱ्या रंगाची एक चार चाकी टाटा योध्दा वाहन क्र. केए २२ सी ६८६५ जुवाकिअ<br>२) १,२०,०००/-रु. एकुण ०४ जर्शी गायी व ०१ देशी बैल |

**थोडक्यात हकिकत** :-वरील ता.वेळी व ठिकाणी यातील आरोपीत चालक पांडुरंग हणमंत पाटील, वय ५१ वर्षे रा.कुप्पगिरी, ता.खानापुर जि.बेळगाव याने त्याच्या ताब्यातील वाहन क्र.केए २२ सी ६८६५ यामध्ये ०४ जर्शी गायी व ०१ देशी बैल यांचा वाहतुकीचा कायदेशिर परवाना न घेता बेकायदेशिर रित्या

वाहतुक करुन त्यांच्या देखभालीसाठी कोणतीही पुरेशी उपाययोजना न करता अन्न चारा त्यांना न देता निर्दयतेने वागणुक देवुन त्यांची वाहतुक करताना मिळुन आला म्हणुन वगैरे मजकुरच्या फिर्यादीवरुन गुन्हा रजिस्टरी दाखल.

सदर गुन्ह्यात आरोपित यांचे वाहनातुन ताब्यातुन गुन्ह्याचे कामी ताब्यात घेण्यात आलेली ०४ जर्शी गायी व ०१ देशी बैल असे मिळणेकरीता अर्जदार विठ्ठल फकिरप्पा कुरबर, वय ४५ वर्षे रा.बडाअंगुलकी, ता.खानापुर जि.बेळगाव यांनी मा.न्यायालयात अर्ज सादर केलेला आहे. सदर अर्जास अनुसरून त्याबाबत तपासिक अंमलदार यांनी दिनांक. २५/०३/२०२६ रोजी किंवा तत्पुर्वी म्हणणे सादर करणेबाबत मा. न्यायालयाचे आदेश झालेले आहेत.

तरी ताब्यात घेण्यात आलेली ०४ जर्शी गायी व ०१ देशी बैल असे सुरक्षेकामी पिपल फॉर ॲनिमल, पार्श्व नगच्या पाठीमागे, सांगली मिरज रोड मिरज येथे जमा करण्यात आलेले आहेत, तसेच यातील आरोपी यांनी सदरची जनावरे ही वाहतुकीचा कायदेशिर परवाना न घेता, बेकायदेशिरित्या वाहतुक करुन त्यांच्या देखभालीसाठी कोणतीही पुरेशी उपाययोजना न करता, अन्न चारा त्यांना न देता, निर्दयपणे वागणुक देवुन, त्यांची वाहतुक करताना मिळुन आलेले असुन परत सदरची जनावरे अर्जदार यांच्या ताब्यात दिल्यास ते पुन्हा सदर प्रकारचा गुन्हा करण्याची शक्यता नाकारता येत नाही. तरी सदरची जनावरे अर्जदार यांच्या ताब्यात देण्यात येवु नये असे आमचे म्हणणे आहे.

मार्फतीने,
पोलीस निरीक्षक
मिरज ग्रामीण पोलीस ठाणे

मा.सविनय सादर

m.P.Kamble
(एम.पी.कांबळे)
पोना/१६९७
मिरज ग्रामिण पोलीस ठाणे

दाखल व पाहुन रवाना

पोलीस निरीक्षक
मिरज ग्रामीण पोलीस ठाणे

Exh. 6

Cri.M.A 91/2026.
~~आर./ एस.सी.सी~~

मिरज येथील मे. प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी सो यांचे कोर्टात

~~महाराष्ट्र सरकार~~ ~~फिर्यादी~~

विठ्ठल फकीरप्पा कुरबर -अर्जदार

विरुध्द

~~आरोपी~~

महाराष्ट्र सरकार जाबदार.

~~यातील नमूद साक्षीदारांना साक्षी समन्स / वॉरंट चा आदेश होणेस~~

~~विनंती आहे.~~

प्रस्तुतकामी अर्जास सरकारपक्षातर्फे म्हणणे सविनय सादर

(1) अर्जदार यांनी मिरज ग्रामीण गु.र.नं. 122/2026 या गुन्ह्यामध्ये जप्त केलेली जनावरे परतीचा अर्ज केलेला आहे.

(2) अर्जदार यांनी सदर अर्जासोबत दाखल केलेला मालकी पुरावा प्रमाणित नाही.

(3) अर्जदार यांनी सदरची जनावरे आरोपीच्या ताब्यात का? व कशासाठी ~~दिली~~ होती, याबाबत अर्जामध्ये स्पष्टीकरण दिले नाही.

(4) अर्जदार यांनी आरोपीच्या ताब्यात जनावरे कोणत्या अवस्थेमध्ये होती, याबाबत कल्पना असून देखील त्याबाबत कोणताही पाठपुरावा केलेला नाही.

Allowed

P.T.O.

(5) पोलिसांनी जनावरांच्या छळ केल्याबाबत गुन्हा दाखल केल्यानंतर अर्जदार यांनी पुन्हा जानवरे गैरफायदासाठी परतीच्या अर्ज केल्या आहे.

(6) सदरची जनावरे सध्या "पिपल फॉर ॲनिमल" या संस्थेमध्ये जमा आहेत. तिथे त्या सर्व जनावरे योग्य स्थितीमध्ये, सर्व साई सुविधां सहित आहेत.

(7) अर्जदार पुन्हा या जनावरांच्या गैरवापर करण्याची शक्यता आहे.

सबब उपरोक्त कारणांच्या विचार करता, सदरचा अर्ज नामंजूर करणेत यावा ही विनंती.

मे. जा. कावे
हिरज
दि. 25/3/26.

Mandle
(A.P.P).